४


चउत्थो पाढो

# पारिणामिया बुद्धी

प्राकृत साहित्यात ज्यांनी आपल्या बहुमुखी प्रतिभेने अप्रतिहत संचार केला- असे हरिभद्रसूरि इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकात होऊन गेले. कथा, न्याय, तर्क, योग, अनेकांत-अशा अनेक विषयांवर साहित्यरचना करणाऱ्या हरिभद्रांनी उपदेशप्रधान ग्रंथही लिहिले. त्यांच्या 'उपदेशपद' नावाच्या ग्रंथावर मुनिचंद्रसूरींनी टीका लिहिली. अनेक प्राकृत कथा त्या टीकेत पद्यबद्ध स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यातील एक कथा या पाठाच्या रूपाने दिली आहे.

जैन संकल्पनेप्रमाणे -बुद्धी चार प्रकारची असते-'औत्पत्तिकी बुद्धी' म्हणजे उपजत ज्ञान; 'वैनयिकी बुद्धी' म्हणजे गुरूंच्या विनयपूर्वक सेवेने मिळणारे ज्ञान; 'कर्मजा बुद्धी' म्हणजे पुन्हा पुन्हा तेच काम करण्याने आलेले कौशल्य आणि 'पारिणामिकी बुद्धी' म्हणजे जीवनातील अनुभवांमुळे आलेले शहाणपण !

चतुर स्त्रीने आपल्या तीन विवाहित मुलींना दिलेला सल्ला किती महत्त्वाचा होता-हे स्पष्ट करणारी ही पारिणामिकी बुद्धीची एक मनोरंजक पद्यबद्ध कथा आहे. कोणाचे किती व काय ऐकावयाचे ते त्याचे त्यांनी ठरवायचे व त्याप्रमाणे योग्य आचरण केले तरच सुखाची प्राप्ती होते. अन्यथा दु;ख भोगावे लागते. हे या कवितेतून पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.



इह अत्थि वसंतपुरं नयरं, तत्थासि निद्धसो नाम ।
धिज्जाइओ महेला, लीलानिलओ सुहा तस्स ।।१।।

जाया य तिन्नि धूया, कमेण तारुन्नमुन्नयं पत्ता ।
वीवाहिया कुलेसुं, निवमंदिर-सविहवेसु ।।२।।

जणणीए चिंतियं, मज्झ दुहियरो, सुत्थिया कहं होज्जा ।
जम्हा पइ-परिणामे, अन्नाए ववहरंतीओ ।।३।।

न भवंति गउरवपयं, ता रहियाणं, कओ सुहासंगो ?
ता जाणामि कहंचि वि, भावं जामाउयाणमहं ।।४।।

भणियाओ धूयाओ, तुब्भेहिं पढम-सुरय-संगम्मि ।
लद्धावसराहिं सिरो, हणणिज्जो पण्हिपहरेण ।।५।।

नियय-पइणो तहच्चिय, ताहिं कए, पुच्छिया पभायम्मि ।
किं तेहिं तुम्ह विहियं, भणियं जेट्ठाए तत्थ इमं ।।६।।

मच्चरण-मद्दणपरो भणइ उ, किं नु दुक्खमणुपत्ता ।
एवंविहो पहारो, न तुम्ह चलणाणमुचिओ त्ति ।।७।।

अइगरुओ आसंघो, ममम्मि तुह, को णु अन्नहा एवं ।
उम्मत्तया-विरहिओ, कज्जं लज्जालुओ कुणइ ? ।।८।।

सा भणिया जणणीए, अइपेम-परव्वसो पई तुज्झं ।
जं कुणसि तं पमाणं, सव्वं तुह, तस्स मा भाहि ।।९।।

बीयाए पुण भणियं, पहार-समणंतरं मणागं सो ।
झिंखणकारी जाओ, खणंतराओ उवरओ त्ति ।।१०।।

सा तीए वि य भणिया, तुमए विहिए अरुच्चमाणम्मि ।
होही झिंखणकारी, नो अन्नं, निग्गहं काही ।।११।।

तइयाए पुण भणियं, तुह निद्देसे मए कए संते ।
दूरा दरिसिय-रोसो, बंधिय सो गेहथंभेण ।।१२।।

कसघाय-सए दासी, मम भासियवं, च दुक्कुला तं सि ।
तो मे तए न कज्जं, एवंविह -कज्जसज्जाए ।।१३।।

माऊए तस्समीवं गंतुं, भणियं अहं एस कुलधम्मो ।
जइ पुण कहवि न कज्जइ, तो ससुरकुलं न नंदेइ ।।१४।।

इय तोसिय तच्चित्तं, भणिया धूया जहेव देवस्स ।
तह वट्टिज्जासि, न अन्नहा, इमो तुह पियकरो त्ति ।।१५।।

जामाउय-चित्त-वियाणणत्थमेयासि, सिक्खणा एसा ।
परिणामिय-बुद्धि-फलं, माहणभज्जाए विन्नेयं ।।१६।।

## शब्दार्थ व टीपा

**तत्थासि** (संधि) -( तत्थ+आसि ) तेथे होता.
**निद्धसो नाम** - निद्धस नावाचा.
**धिज्जाइओ** (पुं.) - ब्राह्मण.
**महेला** (स्त्री.) - महिला, पत्नी.
**लीलानिलओ** (वि.) - क्रीडेचे जणू घर असलेला, विलासात रममाण.
**सुहा** (स्त्री.) - शुभा, ब्राह्मणीचे नाव.
**जाया य तिन्नि धूया** - (त्यांना) तीन मुली झाल्या.
**तारुन्नमुन्नयं** (संधि) - (तारुन्नं + उन्नयं) उन्नत तारुण्य.
**निव-मंदिर-सविहवेसु** - राजासारख्या संपन्न घरांमध्ये.
**दुहियरो** (अ. व.) - दुहिता, मुली.
**सुत्थिय** (वि.) - सुस्थित, सुखी.
**पइपरिणामे अन्नाए** - पतींचे परिणाम (भाव) अज्ञात असताना.
**ववहरंतीओ** (क्रि.) - ('ववहर', व. का. धा. वि., स्त्रीलिंगी, प्रथमा अनेकवचन,) व्यवहार करत असताना.
**गउरवपयं** (समास) - (गउरवस्स पयं । षष्ठी तत्पुरुष) गौरवाचे पद, गौरवास्पद.
**सुहासंगो** (पुं.) - सुखाचा संग, सौख्य.
**जामाउयाणमहं** (संधि) - (जामाउयाणं+अहं) जावयांचा मी (स्वभाव जाणेन).
**धूया** (स्त्री.) - दुहिता, कन्या.
**लद्धावसराहिं** (समास) - लद्धो अवसरो जाहिं ता । (बहुव्रीहि) ज्यांना अवसर (संधी) प्राप्त झाला आहे अशा त्या.
**पण्हिपहरेण** - पायाच्या (पावलाच्या) प्रहाराने.
**पण्हि** (स्त्री.) - पृष्णि, टाच, पावलाचा मागचा भाग.
**नियय-पइणो तहच्चिय ताहिं कए** - आपापल्या पतींच्याबाबत त्यांनी तसेच केल्यानंतर.
**पभाय** (पुं.) - प्रभात, पहाट.
**किं तेहिं तुम्ह विहियं** - त्यांच्याबाबत तुम्ही काय केले?
**गाथा ७ भावार्थ -**
माझे चरणमर्दन करून पती म्हणाला, 'तुला दुखले का? अशा प्रकारचा प्रहार तुझ्या (कोमल) पायाला सोसणार नाही.'
**अइगरुओ आसंघो** - अतिशय आसक्ती, खूपच प्रेम.
**उम्मत्तयाविरहिओ कज्जं लज्जालुओ कुणइ ?** - लज्जाशील आणि वेडा नसलेला कोणता माणूस असे कार्य करेल ?
**मा भाहि** - भिऊ नकोस.
**पहार-समणंतरं** - प्रहार केल्यानंतर.
**मणागं सो झिंखणकारी जाओ** - काही काळ त्याने आरडाओरडा केला.
**उवरओ** (वि.) - थांबला, शांत झाला.
**गाथा (११) भावार्थ -**
ती (आई) तिला म्हणाली, 'तू त्याला न रुचणारे काम केलेस तरी, तो फक्त आरडाओरडा करील. दुसरी काही शिक्षा करणार नाही.'
**झिंखणकारी** (समास)- झिंखणं करेइ त्ति । (उपपद तत्पुरुष) आरडाओरडा करणारा.
**दूरा दरिसियरोसो** (वि.) - खूपच क्रोध प्रगट करणारा.
**बंधिय** (क्रि.) - ('बंध', अनियमित पू. का. धा. अ.,) बांधून.
**कस-घाय-सए दासी** - चाबकाचे शंभर फटके दिले.
**मम भासियवं** - मला म्हणाला.
**दुक्कुला** - दुष्ट कुळातली, वाईट संस्काराची.
**एवंविह-कज्ज-सज्जाए** - अशा प्रकारचे (लाथ मारण्याचे) काम करण्यास तयार झालेल्या.
**गाथा (१४) भावार्थ -**
आई त्याच्या (तिसऱ्या जावयाच्या) जवळ जाऊन म्हणाली, हा आमचा कुलधर्म आहे. हा (कुलाचार) पाळला नाही तर सासरी नांदता येत नाही.'
**भणियम्ह** (संधि) - भणियं + अम्ह ।
**इय तोसिय तच्चित्तं** - अशा प्रकारे त्याचे (जावयाचे) चित्त संतुष्ट करून.
**वट्टिज्जासि** - वागावेस.
**गाथा (१६) भावार्थ -**
जावयांचे चित्त (अभिप्राय) जाणून घेण्यासाठी ब्राह्मण-पत्नीने जी शिकवण दिली ते तिच्या पारिणामिकी बुद्धीचे फळ जाणावे.
**माहणभज्जा** (समास) - (माहणस्स भज्जा षष्ठी तत्पुरुष) ब्राह्मणाची पत्नी.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) तिण्हं कण्णाणं जणणीए किं चिंतियं ? (गा. ३)
(२) माऊए धूयाणं का सिक्खा दिण्णा ? (गा. ५)
(३) तइएण जामाउणा भज्जा कहं दंडिया ? (गा. १२, १३)

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मुली सासरी सुखी होण्यासाठी चतुर स्त्रीने मुलींना कोणता सल्ला दिला ?
(२) पहिल्या जावयाची कोणती प्रतिक्रिया झाली ? आईने पहिल्या मुलीस कोणता सल्ला दिला ?
(३) दुसऱ्या जावयाची कोणती प्रतिक्रिया झाली ? आईने दुसऱ्या मुलीस कोणता सल्ला दिला ?
(४) चतुर स्त्रीने तिसऱ्या जावयाची समजूत कशा प्रकारे काढली? तिने तिसऱ्या मुलीस कोणता सल्ला दिला ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) कंसातील शब्दांपैकी योग्य रूप घालून वाक्य पूर्ण करा.**

(१) मम दुहियाओ गउरवपयं न (भवइ/भवंति) ।
(२) वसंतपुरे नयरे (निद्धसेण/निद्धसो) नाम बंभणो आसि ।
(३) सा जणणीए (भणिओ/भणिया) ।
(४) तुमं जं (कुणसि/कुणइ) तं पमाणं ।
(५) माऊए तस्समीवं (गंतुं/गयं) कहियं ।

**ब) पुढील प्राकृत शब्दांना समानार्थी प्राकृत शब्द लिहा.**

जणणी, दुहिया, भण, घाय, कोह

### विशेष अभ्यास

**पुढील शब्दांना प्राकृत तद्भव शब्द देऊन त्यातील स्वर-व्यंजनांचे बदल, शिक्षकांच्या मदतीने नोंदवा-**

पति, गौरव, मर्दन, निर्देश, शत, अन्यथा, स्तम्भ

❑ ❑ ❑